(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# जागतिकीकरणाचे धोरण व नेहरु विचारधारा

डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे.
प्राध्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग, समन्वयक, नेहरु अभ्यास केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

..........................................................................................................................

**प्रस्तावना**

पंडित जवाहरलाल नेहरु हे असामान्य, प्रभावी लोकोत्तर व्यक्तिमत्त्व होते. स्वातंत्र्य आंदोलनातील नेता, भारताचे पंतप्रधान, एक मुत्सद्दी व आंतरराष्ट्रीय प्रतिमा प्रतिष्ठा असणारा मानवतावादी नेता, अशा भूमिकेतून पंडित नेहरुंची ओळख भारतालाच नव्हे, तर जगालाही आहे. पंडित नेहरु यांचा कालखंड अभ्यासाच्या सोयीसाठी प्रामुख्याने दोन भागांत विभागलेला आहे पहिल्या काळात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झगडणारे नेहरु, तर दुसरा कालखंड म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात भारताला जगाच्या पाठीवर एक नवे लोकशाही राष्ट्र घडविण्यासाठी झगडणारे नेहरु अशा स्वरुपाचा होता. पंडित नेहरुंना जेवढी लोकप्रियता लाभली, तेवढाच त्यांना विरोधही सहन करावा लागला. नेहरुंच्या धोरणाचे समर्थक आणि विरोधक आजही प्रखरपणे नेहरु विचारांची चिकीत्सा करतच आहेत.

भारताच्या राजकारणात, समाजकारणात नेहरुंचे अतुलनीय योगदान आहे. आपल्या जीवनातील तब्बल तीस वर्षे पंडित नेहरुंनी भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ब्रिटिशांशी झगडण्यात घालविले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात ब्रिटिश सत्तेशी झगडत असताना एकंदरीत या कालखंडात पंडित नेहरुंना जवळपास नऊ वर्षाचा कारावास भोगला. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित जवाहरलाल नेहरुंनी भारताचे नेतृत्त्व सतरा वर्षे केले. या काळात भारताची आधुनिक दृष्टी निर्माण करण्याचे त्याचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आणि अतुलनीय असेच आहे. देशातील सर्वसामान्य जनतेत आत्मविश्वास निर्माण करुन तो वाढीस लावण्याचे कार्य नेहरुंच्या नेतृत्त्वाचाच एक भाग होता. भारताची ओळख खऱ्या अर्थाने जगाला करुन देणारे हे एक महान नेते होते. भारताला आणि जागतिक राजकारणाला नेहरु विचारांचा एक प्रवाह अजूनही प्रभावित व मार्गदर्शन करणारा राहिलेला आहे. नेहरु विचारांच्या प्रवाहाची ही जमेची बाजू बघितली तर नेहरुविरोधी विचारांची दुसरी बाजूसुध्दा आपणास टाळून चालणार नाही. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरुंचे नेतृत्त्व वादरहित राहण्याची मुळीच संभावणा नाही; पण त्या वादामुळे नेहरुंच्या नेतृत्त्वाचे योगदान आपल्याला टाळता येत नाही. त्यामुळेच नेहरुंच्या नेतृत्त्वाची, त्यांच्या योगदानाची तटस्थ चर्चा करत आणि पंडित जवाहरलाल नेहरुंच्या बद्दल असलेल्या समज—गैरसमज यांचे निराकरण आजच्या परिस्थितीत होणे गरजेचे आहे.

पंडित जवाहरलाल नेहरुंसारखे भारताला द्रुष्टे नेतृत्त्व लाभले म्हणून नेहरुप्रणीत संसदीय लोकशाहीची उभारणी भारतात सुदृढ पायावर होऊ शकली आणि धर्मनिरपेक्षता हे हेलकावे खाणारे तत्त्व भारतात धर्माचे अधिष्ठान असलेल्या लोकशाही देशात रुजू शकले, इतकेच नव्हे, तर ते विकसित होऊन भारतात समृध्द होऊ शकले आणि त्यावर भारतीय शासनव्यवस्था स्थिर होवून स्थिरावू शकली. नेहरुंच्या भारतातील नेतृत्त्वाचे आणि कार्याचे मूल्यमापन करावयाचे म्हटले तर भारतात केलेल्या कार्याचे पारडे निश्चितच जड ठरलेले आहे. हे आपणास निर्विवादपणे मान्यच करावे लागते. नवस्वतंत्र भारतीय जनतेला आपल्यासमोरील आव्हानांची सोडवणूक हवी होती आणि ते लवकर सोडविणे शक्य नव्हते. त्यास ठरावीक कालखंड जाऊ देणे गरजेचे होते. नेहरुंना खात्री होती की योजनाबध्दरित्या प्रयत्न करुन हे प्रश्न सोडविता येतात, यासाठी जगात दीर्घकाळ शांतता नांदणे गरजेचे होते; पण ती शांतता भारताला लाभली नाही. या काळात नेहरुंनी विकासक्रम आखत आधुनिक भारताची पायाभरणी केली. नेहरुंच्या विचारधारेवर नेहरुंचा स्वप्नाळू किंवा आदर्शवाद यावरच टिकाकार विवेचन करतात. तसे न करता नेहरुंच्या विचारांची चर्चा, मूल्यमापन यथासांगपणे व्हावे, याकरिता नव्याने विचारमंथन

व्हावे, भारताच्या परिवेशात पंडित जवाहरलाल नेहरुंचे पुनः अध्ययन, विश्लेषण, मूल्यांकन व्हावे या हेतूने या विषयाची मांडणी केली आहे.

पंडित जवाहरलाल नेहरुंची विचार मांडणे म्हणजे इतिहास सांगणे नसून इतिहास घडवणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणे हा आहे. या व्यक्तीच्या जीवनात संघर्ष आहे, इतिहासाला वळण देण्याचे सामर्थ्य आहे, या अनुषंगाने तत्कालीन भारताची परिस्थिती जाणून घेण्यास आणि त्या परिस्थितीत नेहरुंनी घेतलेले निर्णय व ते आजच्या परिस्थितीत भारताच्या जडण–घडणीसाठी कसे उपयुक्त ठरले हे मांडणे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात नेहरुंच्या विचारधारेच्या प्रस्तुततेचा नव्याने वेध घेणे क्रमप्राप्त आहे.

पंडित नेहरु यांच्यासमोर असंख्य समस्या उभ्या होत्या. त्या सर्व समस्यांचे स्वरुप अत्यंत व्यापक आणि गुंतागुतीचे होते. ह्या समस्या ब्रिटिश काळापासून जाणून–बुजून रुजवल्या होत्या. तशाच काही भारतीय परंपरा, चालीरिती यातून निर्माण झाल्या होत्या. लोकांना सर्व प्रश्नांची तात्काळ आणि समाधानकारक सोडवणूक अपेक्षीत होती. कोणत्याही नवस्वतंत्र देशातील जनतेची आतूर आणि उत्कट इच्छा असते तशी भारतीयांची देखिल होती. जनतेच्या अपेक्षा विकासाच्या होत्या पण या अपेक्षा पूर्ण करता येणे अशक्य होते. नेहरुंचे मोठेपण यात आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतासमोरील प्रश्नांचा त्यांनी विचार करण्यास सुरुवात केली होती. स्वतःच्या मनाशी त्यांनी त्या प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी काही दिशा निश्चित केलेल्या होत्या. त्यामुळे आजच्या काळात आपणास भारताचा जो आधुनिक चेहरा–मोहरा बघण्यास मिळतो. त्याचे श्रेय फक्त आणि फक्त पंडित जवाहरलाल नेहरुंनाच द्यावे लागते. याकरिता त्यांनी योजनाबध्द विकास कार्यक्रम राबविला होता. पंचवार्षिक योजनांचा स्वीकार, संसदीय लोकशाही, अलिप्ततावाद, मिश्र अर्थव्यवस्था, धर्मनिरपेक्षता, लोकशाही समाजवाद, औद्योगिक धोरण, शेती क्षेत्राचा विकास साधणे याद्वारे योजनाबध्द विकास सहजशक्य करुन दाखविला. भारताला अपेक्षित विकास साधण्याकरिता शांततेची आवश्यकता होती; पण ती लाभली नाही. भारत–चीन व भारत–पाक या युध्दात भारताची आर्थिक हानी झाली होती. त्यामुळे पंचवार्षिक योजनेतील खर्च अनपेक्षितपणे युध्दावर करण्यास भाग पडले. तसे झाले नसते तर निश्चितच भारताचे आजच्यापेक्षा वेगळे विकसित रुप आपणास पहावयास मिळाले असते.

पंडित जवाहरलाल नेहरुंच्या विचारांचे चिंतन, मनन, आकलन केले नाही त्या व्यक्तीला नेहरुंच्या नेतृत्त्वाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होणारच आहे. त्या प्रश्नाचे समाधान व्हावे आणि नेहरु विचारांचा अमूल्य ठेवा, ज्या विचारांनी आपला भारत घडला त्या विचारांचा भावी पिढीला प्रत्यय आला पाहीजे. भारतातील नेहरुंच्या कार्याला आज आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त झाले आहे. ज्या देशांनी नंतरच्या काळात स्वातंत्र्य मिळवले त्या देशांनी भारताच्या नीतीचा अवलंब या नीतीच्या प्रस्तुततेच्या कारणावरुनच केला आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळातदेखिल पंडित नेहरुंचे मूलगामी विचार म्हणून अलिप्ततावाद, जगात शांतता प्रस्थापनेसाठी पंचशील तत्त्वे, लोकशाही समाजवाद, पंचवार्षिक योजना, धर्मनिरपेक्षता, मिश्र अर्थव्यवस्था इत्यादी विचारांची भारतालाच नव्हे, तर जगालाही गरज आहे. पंडित जवाहरलाल नेहरुंच्या विचारांची आणि कार्याची उपयुक्तता सार्वकालीन आहे. त्यांनी मांडलेली भुमिका, घेतलेले निर्णय आजही राज्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरत आहेत. त्याच्या विचारधारेचा आधार आजही भारतीय राजकीय व्यवस्थेते घेतलेला दिसून येतो.

नेहरुच्या विचारधारेचा मोठया प्रमाणात प्रभाव स्वांतत्र्योत्तर काळापासून दिसून येतो. नेहरु विचारधारा ही गांधीवादी तत्वज्ञान, अहिंसावादी विचारसरणी, अरविंद घोष आणि रविंद्रनाथ टागोर यांचा अध्यात्मवाद आणि आंतरराष्ट्रीयवादाने प्रभावित होती. पंडित जवाहरलाल नेहरुची विचारधारा ही आर्दशवादी स्वरुपाची होती. अहिंसेच्या माध्यमातून युध्दाला विरोध, शांततेमधुन हस्तक्षेप विरोधी धोरण आणि सहकार्यातून शांततापुर्ण सहजीवन ही नेहरुची विचारधारा

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकीय व्यवस्थेची आधारशीला किंवा तत्त्वे म्हणून विकसित झाली. नेहरुचा लोकशाही समाजवाद याच विचारसरणीतून विकसित झालेला होता.

ब्रिटिशाच्या काळात भारतीय जनतेचे मोठयाप्रमाणात शोषण झालेले होते. प्राचीन काळात भारतातील खेडी स्वंयपुर्ण होती. परंतु ब्रिटिशाच्या काळात भारतातील उदयोगधंदे मोडकळीस आले होते. त्याचबरोबर भारतासमोर दारिद्रय, रोगराई, बेकारी, शिक्षणाचा अभाव, अंधश्रध्दा या मोठया समस्या होत्या. पंडित नेहरुंचे भारताला आत्मनिर्भर आणि प्रगतीशिल बनविण्याचे स्वप्न होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही तत्त्वावर नेहरु विचारधारा आधारलेली होता.

पंडित नेहरु स्वातंत्र्योत्तर काळात पंतप्रधान असताना त्यांनी समाजवादाचे धोरण अंमलात आणले. त्यासाठी त्यांनी राष्ट्रीय नियोजन मंडळाची स्थापना केली. धर्मनिरपेक्षता, समता आणि स्वातंत्र्य, बंधुता या संकल्पनाचा स्विकार केला. त्यानुसार प्रत्येक राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचा व एकात्मतेचा आदर राखून अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, समानता आणि शांततापुर्ण सहजीवन या तत्वाचा स्वीकार केला. अलिप्ततावादी धोरणाचा आतंरराष्ट्रीय स्तरावर स्वीकार केला. कल्याणकारी राज्याची कल्पना व लोकशाही समाजवादाचे मुळ रुजविण्यात नेहरुंनी पुढाकार घेतला. नेहरुंना भारतातील गरिबी, बेरोजगारी, मागासलेपणा नष्ट करण्यासाठी लोकशाही समाजवाद आवश्यक वाटत होता. त्यासाठी राष्ट्रीय आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून समाजवादाचे ध्येय साधण्याचा नेहरुंचा प्रयत्न होता.

पंडित जवाहरलाल नेहरुंची विचारधारा ही आदर्शवादी दृष्टीकोणाने प्रभावित असून हितसंबंधापेक्षा विचारसरणीला झुकते माप देणारी होती. नेहरुनंतरही १९९० पर्यंतच्या कालावधीमध्ये नेहरु विचारधारेवर आधारित भारतीय राजकीय व आर्थिक व्यवस्था आणि परराष्ट्र धोरण दिसून येते. १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. त्यामध्ये जागतिकीकरणाच्या राष्ट्रीय हितसंबंधाना नेहरु विचारधारेपेक्षा अधिक महत्त्व देण्यात आले. विश्व व्यापार संघटनेची स्थापना, विभागीय व्यापार संघाची वाढती सक्रियता आणि भूमिका यामुळे आर्थिक हितसंबंधाच्या रक्षणाला महत्त्व प्राप्त झाले. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, मुक्त बाजारपेठ, मुक्त अर्थव्यवस्था, विश्व व्यापार संघटना, जागतिक बॅक, विश्व नाणेनिधी इत्यादी संकल्पना, करार व संस्थांच्या माध्यमातून भारतावर दबाव आणण्यात आला. भारताने जागतिकीकरणाचा नाईलाजाने स्वीकार केला असल्यामुळे स्वाभाविकपणे भारताच्या अर्थव्यवस्थेवर याचा परिणाम मोठयाप्रमाणात झालेला आहे. भारतीय उद्योगधंदयावर याचा विपरीत परिणाम होऊन मुळ पारंपारीक उद्योगधंदे, व्यवसाय मोडकळीस आले. पर्यायाने जागतिकीकरणाचा भारतीय सार्वभौमत्वावरही काही प्रमाणात परिणाम झालेला आहे. जागतिकीकरणाच्या धोरणाखाली परकीय उद्योग जेव्हा भारतासारख्या देशात आले तेव्हा त्याच्या मुक्त स्पर्धेत देशी उद्योग नष्ट होऊन अविकसित व विकसनशिल देशाच्या अर्थव्यवस्थेवर विकसित देशाचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

जागतिकीकरणाच्या धोरणामुळे सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करुन उद्योग व्यवसायाच्या उत्पादनासाठी आवश्यक असणारी साधने बहुराष्ट्रीय कंपन्याकडे हस्तांतरीत होत आहेत. जागतिकीकरणाचे धोरण हे नेहरु विचारधारेतील लोकशाही समाजवादाच्या विरुध्द आहे. नेहरुंनी आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पाहिले होते ते पूर्ण करण्यासाठी नेहरु विचारधारा आजही तेवढीच महत्त्वपूर्ण आहे. पंचवार्षिक योजना, राष्ट्रीय नियोजन मंडळ तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अलीप्तता चळवळ, सार्क, आसीयान या सारख्या सहकार्यात्मक सहजीवनावर आधारित संघटनाचे महत्त्व व उपयुक्तता आजही आहे. त्यासाठी जागतिकीकरणाच्या संदर्भात नेहरु विचारधारा प्रासंगिक आहे

स्वांतत्र्योत्तर भारतीय राजकीय व्यवस्थेवर पंडित जवाहरलाल नेहरुंच्या विचारधारेचा प्रभाव मोठयाप्रमाणात दिसून येतो. त्यांच्या कार्याचा आढावा घेतला तर त्यांच्या कार्याचे मोठेपण लक्षात येते. नेहरुंनी भारतातील दारिद्रय निर्मूलनासाठी केलेले कार्य, भारताने

स्विकारलेला अलिप्ततावाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही समाजवाद, पंचवार्षिक योजना ह्या बाबी भारताच्या विकासाच्या अंगाचा प्रमुख भाग म्हणूनच आपणास पहाव्या लागतात; पण या भूमिका घेण्यामागील नेहरुंची भूमिका उदात्त अशीच होती. देशासमोरील प्रश्न आणि त्या अंगाने घेतलेले निर्णय हे भारताच्या विकासाच्या दृष्टीने उपयुक्त तर होतेच; पण त्यासोबत जागतिक परिस्थितीला देखील उपयुक्त ठरलेले निर्णय होते. स्वातंत्र्यप्राप्तीपासून १९९०पर्यंत भारतीय राजकीय व्यवस्थेवर नेहरु विचारधारेचा प्रभाव दिसून येतो. परंतू १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामुळे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाला प्रोत्साहन देणारी भूमिका भारताने स्विकारली त्यामुळे या धोरणाचा नेहरु विचारधारेवर प्रभाव पडलेला आहे

मानवतेचा एक महान पुजारी आणि भारताचा एक अद्वितीय नेता जेव्हा आपल्या देहाचा कणन्‌कण मातृभूमीच्या मातीत मिसळावा अशी अंतिम इच्छा प्रकट करतो. तेव्हा त्याच्यातील ज्वलंत राष्ट्रवाद प्रत्ययास येतो. नेहरु हे प्रखर राष्ट्रवादी होते. त्यांच्या अणुरेणूत राष्ट्र चेतना भिनली होती. भारताच्या सर्वांगिण उत्कर्षासाठी त्यांनी आपला देह झिजवला. त्यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत शांतता आणि प्रगती या मानवतेच्या अत्युच्च ध्येयासाठी आपले सर्वस्व वेचले होते.

**संदर्भ सूची**

1 अकबर एम. जे., (करुणा गोखले अनु.), (२०१५), 'नेहरु नवभारताचे शिल्पकार', राजहंस पब्लिकेशन, पुणे.
2 आपटे प्रभा, (१९९०), 'पंडित नेहरु आणि संसदीय परंपरा', मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई.
3 दास. एम. एन., (१९६१), 'दि पोलिटिकल फिलॉसफी ऑफ जवाहरलाल नेहरु',
4 दास. एम. एन., (१९६१), 'दि पोलिटिकल फिलॉसफी ऑफ जवाहरलाल नेहरु',
5 गोडबोले माधव, (२०१४), 'जवाहरलाल नेहरुंचे नेतृत्व', राजहंस प्रकाशन, पुणे
6 गाडगीळ स. रा., नवभारताचे शिल्पकार, पं. जवाहरलाल नेहरु, (प्रथम आवृत्ती) शलाका प्रकाशन, १९९४, मुंबई.
7 राजूरकर न. गो., नरहर कुरुंदकर पं. नेहरु एक मागोवा (द्वितीय आवृत्ती) पधगंधा प्रकाशन, २००८, पुणे.